


**सोमवंशी पाठारे क्षत्रिय समाजोन्नति संघ**

नोंदणी क्र. ए-३९५ (मुंबई)

**कै. गंगाधर पिलाजी चौधरी व कै. रघुवीर पाटील यांच्या स्मृतीस समर्पित**

# त्रैमासिक वृत्तपत्रिका

**अंक : १३५** **सप्टेंबर : २०१५** **वर्ष : ३८**



**※ संपादक**
**विनय रघुनाथ राऊत**
९८२३२५१९४७
**※ सहसंपादक**
वंदेश दे. पुरव
तरंग ज. पाटील
सुचिता प्र. पाटील
दिपक ना. पाटील
मेघा रो. पाटील
**※ विश्वस्त**
विरेंद्र न. पाटील,अध्यक्ष
९९६९१५८६९३
यशवंत ना. राऊत,
भरत ना. ठाकूर
हेमंत ना. राऊत
अनंत दा. राऊत
प्रमोद ज. राऊत
विमल र. राऊत
**※ सल्लागार**
आमदार हितेंद्र वि. ठाकूर
आमदार कपिल ह. पाटील
आमदार क्षितिज हि. ठाकूर
**※ संघाचे अध्यक्ष**
**पराग परशुराम राऊत**
९८६९०१७६८२
**※ मुख्य चिटणीस**
वंदेश देवजी पुरव
९८६९६६४००२
**※ खजिनदार**
विजय द. पाटील
९२२४३७५४८०
**※ सहचिटणीस**
अभिजीत प्र. राऊत
अभय ज. राऊत
**※ गृहपाल**
अशोक मो. पाटील
९२७३११३७७०
किशोर रा. ठाकूर
प्रभाकर गो. ठाकूर
**※ ग्रंथपाल**
रविंद्र स. राऊत

**संपादकीय**

## शोध - वधू वरांचा

''इंजिनिअर होऊन MBA फायनान्स केलेल्या व ५0,000 पेक्षा जास्त पगाराची नोकरी असलेल्या मुलीसाठी मुलगा शोधत आहोत. मुलगा समाजातला हवा व जास्त शिकलेला आणि पगार असलेला हवा. हं ! फक्त तो शहरातला हवा आणि त्याचे स्वतःचे निवासस्थान असेल तर उत्तमच, निर्व्यसनी हवाच अशा अनेक अपेक्षा ! मुलांच्याही अपेक्षा तशाच. मुलगी शहराकडची असो वा गावाकडची. शहरातली मुलगी असेल तर उत्तमच पण गावाकडची असेल तर जास्त शिकलेली व पगार असलेली असेल तर बरे.'' हे दृश्य आजकाल सर्व समाजात दिसत आहे. आपणही त्यात आलोच. आजची लग्नव्यवस्था बदलत चालली आहे मी लग्नाच्या चालीरीती बद्दल नाही तर लग्न जमण्याच्या, जमवण्याच्या पद्धती बद्दल बोलत आहे.

आपल्या समाजातील मुले- मुली खूप मोठ्या प्रमाणात उच्चविद्याविभूषित होत आहेत. एकमेकांसाठी अनुरुप वधू वर शोधण्यासाठी पालकांना खूप प्रयास पडत आहेत. फक्त आपल्याच ज्ञातीत, समाजात मुलामुलीची लग्ने व्हावी ह्या मताचे किंवा संकुचित वृत्तीचे आपण नाहीत. पण आपल्याच ज्ञातीतील वधू किंवा वर शोधण्याचा पालकांचा प्रथम प्रयत्न असतो. ह्यात पालकांचा स्वार्थ असतोच. ज्ञातीतील वधू-वर असल्यास दोघांचेही नातेवाईक एकमेकांना परिचीत असल्या कारणाने लग्नविधी वैगेरे सर्व कार्यक्रम खेळीमेळीने पार पाडता येतात. एखाद्या कठीण प्रसंगी परिचीत नातेवाईक असल्याने समझोता करणे सोपे जाते. पण आजच्या या इंटरनेट युगात ग्रामीण व शहरी भागातील मुलामुलींचा समन्वय साधला जात नाही. आपल्या ग्रामीण भागाचे वेगाने शहरीकरण होत आहे पण खरी गोष्ट ही आहे की शहरातील व ग्रामीण भागातील युवक युवतींची साधी तोंडओळख ही नाही. आपल्या मुला मुलींसाठी योग्य जोडीदार आपल्या ज्ञातीत आहे हे ह्या

**एकमेका साह्य करू । अवघे धरू सुपंथ ।।**

इंटरनेट, व्हाटसअॅप युगात प्रत्यक्ष संवाद साधत नसल्यामुळे कळतच नाही.

शहरी व ग्रामीण युवक युवतींचा समन्वय साधण्यासाठी वधु-वर सूचक समितीच्या विद्यमाने त्रैमासिक वृत्तपत्रिकेद्वारे आपण एक संकल्पना राबवणार आहोत. लग्नायोग्य युवक युवतीनी आपली माहीती व जोडीदाराबद्दलच्या अपेक्षा जमल्यास फोटोसहीत लेखी स्वरुपात वधू वर सूचक समिती अथवा त्रैमासिक वृत्तपत्रिका संपादक मंडळाकडे पाठवावी. ही माहीती सलग दोन त्रैमासिक वृत्तपत्रिकेत छापून येणार असून ह्यासाठी नाममात्र शुल्क आकारण्यात येणार आहे.

आजकालच्या जोडीदारासाठी तो आपल्यापेक्षा जास्त किंवा आपल्या इतका शिकलेला हवा, नोकरी चांगली असलेली हवी, घर हवे अशा अपेक्षा एकमेकांबद्दल बाळगल्या जातात. पण एखादा तरुण/ तरुणी तांत्रिक / अभियांत्रिकी शिक्षण घेऊन यशस्वी व्यवसाय करीत असेल, यशस्वी शेती करीत असेल तरीही त्याचे शिक्षण बघितले जाते. यशस्वी शेती, उद्योग करण्यांऱ्यास नाकारले जाते. ह्यासाठी ज्ञातीतील युवक-युवतींचे /पालकांचे मेळावे घेणे, त्यांचे समुपदेशन करणे आवश्यक वाटत आहे. वधू वर सूचक समिती वधू वर मेळावा आयोजित करत असतेच त्याच्या जोडीला विधवा व विधुर, घटस्फोटीत आणि वयाची ३५ शी पार केलेल्या प्रौढांसाठी पण एक मेळावा आयोजित करणे आवश्यकच नाहीतर क्रमप्राप्तच आहे !

---

### पं. वि. आत्माराम ना. राऊत यांच्या स्मृतिस अभिवादन

## आदिवासी सेवक - आत्माराम नानाजी राऊत

आत्माराम नाना राऊत यांनी म. गांधीजींच्या प्रेरणेने स्थापन झालेल्या आदिवासी सेवा मंडळात आचार्य भिसे यांच्या मार्गदर्शनाखाली सेवक म्हणून काम केले. शासनाने कुळ कायदा पास केला तेव्हा त्यांनी गावोगावी फिरुन आदिवासींना कुळकायद्याची माहिती देऊन त्यांना संरक्षित कुळ म्हणून हक्क मिळवून दिला. पुढे कसेल त्याची जमीन हा कायदा झाल्यामुळे आदिवासी कुळे जमीन मालक झाली. जंगल कामगार सहकारी सोसायट्यांचे व्यवस्थापन आदिवासी सेवा मंडळाकडे असल्यामुळे त्यांनी आदिवासींना लाकुडतोड, त्याची वाहतुक, त्यावरील प्रक्रिया व लाकुड विक्री करता यावी म्हणुन मदत व मार्गदर्शन केले. त्याकाळी सेवा मंडळाद्वारे खावटी कोठारे सुरु केली होती. या कोठारात धान्य आणुन ठेवण्यासाठी आदिवासींची मने उद्युक्त केली व जरुरीच्या वेळी हे धान्य उपलब्ध करुन दिले. यामुळे सावकारशाहीला आळा बसला. आदिवासी लोकात शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून सेवा मंडळाने काढलेल्या शाळा व वसतीगृह यांचे व्यवस्थापन उत्तमरीत्या सांभाळून आदिवासीच्या मुलांची जीवनबाग फुलवण्याचे महत्कार्य केले. अशा या आदिवासी सेवकांची जन्मशताब्दी त्याच्या मुलांनी व नातेवाईकांनी अर्थात सुधीर राऊत याच्या पुढाकारानी संपन्न केली त्याबद्दल सर्वांना धन्यवाद. संपूर्ण आयुष्य समाजसेवेसाठी वेचणाऱ्या आत्माराम नाना राऊत या समाजसेवकाला जन्मशताब्दीनिमित्त प्रणाम!

शब्दांकन : **श्रीनिवास काशिनाथ पाटील** (माजी विश्वस्त)

## सो.पा.क्ष.स.संघ
## विषय नियामक समितीची सभा

सो.पा.क्ष.स.संघाची विषय नियामक समितीची सभा रविवार दि. २६ जुलै २०१५ रोजी डॉ. मधुकर ब. राऊत समाजमंदिर येथे संघाचे माननीय अध्यक्ष श्री. अशोक ना. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सदर सभेत ८८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे मांडण्यात येणाऱ्या ठरावास मान्यता देण्यात आली.

### ८८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

सो.पा.क्ष.स. संघाची ८८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक २६ जुलै २०१५ रोजी डॉ. मधुकर ब. राऊत समाजमंदिर येथे मान. अध्यक्ष श्री. अशोक ना. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. मान. अध्यक्षांनी दिवंगत व्यक्तींना श्रद्धांजली अर्पण केली व सर्व उपस्थितांचे स्वागत केले. २०१४-१५ सालातील त्यांच्या कार्याचा आढावा घेऊन त्यांना सहाय्य करणाऱ्या सर्व व्यक्तिंचे आभार मानले. मुख्यचिटणीसांनी सादर केलेल्या मागील वर्षाचे इतिवृत्त तसेच सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाचा अहवाल, जमाखर्च व ताळेबंद यांना मंजुरी देण्यात आली. सन २०१५-१६ सालाकरीता संघाच्या पदाधिकारी मंडळाची निवड करण्यात आली. (यादी दिली आहे.) सर्व निवृत्त पदाधिकाऱ्यांबद्दल ऋणनिर्देश करण्यात येऊन, नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे पुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

श्री. प्रमोद जनार्दन राऊत यांची वयाची ७५ वर्षे पुर्ण झाल्यामुळे, श्री. भरत नारायण ठाकूर व श्री. यशवंत नारायण राऊत यांचा विश्वस्तपदाचा कार्यकाल पुर्ण झाल्यामुळे रिक्त होणाऱ्या विश्वस्त पदासाठी श्री. मंगेश गणपत पाटील, श्री. दिपक नानाजी पाटील व श्री. सुधीर आत्माराम राऊत यांच्या नियुक्तीस मान्यता देण्यात आली. नवनिर्वाचित अध्यक्ष श्री. पराग परशुराम राऊत यांनी समाजबांधवांचे आभार मानून अध्यक्षपदाची सुत्रे स्विकारली. अध्यक्षपद स्विकारताच त्यांनी १ ऑगस्ट २०१५ रोजी पदाधिकाऱ्यांची सभा दहिसर येथे घेण्याचे जाहीर केले व येत्या वर्षात भरगच्च कार्यक्रम घेण्याचे सूतोवाच करुन त्यांच्या तडफदार नेतृत्वाची चुणुक दाखविली.

---

## युवा विकास समिती • क्रिडा समिती • सालवड शाखा
## पावसाळी क्रिकेट स्पर्धा

सो.पा.क्ष.स. संघाची सालवड शाखा, युवा विकास समिती, क्रिडा स्पर्धा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १९ जुलै २०१५ रोजी सालवड येथे पावसाळी क्रिकेट स्पर्धा यशस्वीपणे आयोजित करण्यात आल्या. ह्या स्पर्धेत वरोर, मांडे, कमारे, नांदगाव, पंचाळी, उमरोळी, अल्याळी, नरपड व सालवड या संघाने भाग घेतला. ह्या स्पर्धेत नरपड संघ विजेता तर अल्याळी संघ उपविजेता ठरला. विजेता, उपविजेता संघाला चषक व सालवड शाखेतर्फे रोख बक्षिस देण्यात आली. संघाचे विश्वस्त यशवंत राऊत, सालवड सरपंच सुगंधा पाटील, वंदेश पुरव, गिरीश राऊत, संजय पाटील, आनंद राऊत, हरेश राऊत, स्नेहल पाटील, निशांत पाटील, प्रियाल पुरव उपस्थित होते. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी सालवडचे विनय पाटील, अभिताब राऊत, रोहन राऊत तसेच इतर तरुणांचे सहकार्य लाभले.

# सोमवंशी पाठारे क्षत्रिय समाजोन्नति संघ

## व्यवस्थापक मंडळ - सन २०१५-१६

### ❖ विश्वस्त समिती ❖

श्री. विरेंद्र नरोत्तम पाटील - अध्यक्ष

सौ. विमल रघुनाथ राऊत ● श्री. अनंत दामोदर राऊत ● श्री. हेमंत नारायण राऊत

श्री. यशवंत नारायण राऊत(२०-८-१५ पर्यंत) ● श्री. भरत नारायण ठाकूर(२०-८-१५ पर्यंत) ● श्री. प्रमोद जर्नादन राऊत (२-९-१५ पर्यंत)

श्री. मंगेश गणपत पाटील (२१-८-१५ पासून) ● श्री. दिपक नानाजी पाटील (२१-८-१५ पासून) ● श्री. सुधीर आत्माराम राऊत (३-९-१५ पासून)

### ❖ विशेष सल्लागार ❖

● लोकनेते आमदार श्री. हितेंद्र विष्णू ठाकूर ● आमदार- श्री. कपिल हरिश्चंद्र पाटील

● आमदार - श्री. क्षितिज हितेंद्र ठाकूर

### ❖ पदाधिकारी ❖

अध्यक्ष - श्री. पराग परशुराम राऊत

| | | | |
|---|---|---|---|
| उपाध्यक्ष - | श्री. प्रशांत मुकुंद पाटील | उपाध्यक्षा - | श्रीम. रुचिता रमेश पाटील |
| खजिनदार - | श्री. विजय दशरथ पाटील | मुख्य चिटणीस - | श्री. वंदेश देवजी पुरव |
| सहा. चिटणीस - | श्री. अभिजित प्रकाश राऊत, श्री. अभय जयराम राऊत | | |
| गृहपाल | श्री. अशोक मोरेश्वर पाटील | ग्रंथपाल - | श्री. रविंद्र सखाराम राऊत |
| सहाय्यक गृहपाल - | श्री. किशोर रामचंद्र ठाकूर, श्री. प्रभाकर गो. ठाकूर | | |
| म. वि. समिती कार्याध्यक्षा- | श्रीम. निलम विकास राऊत | यु. वि. समिती कार्याध्यक्ष - | श्री. गिरीश लक्ष्मण राऊत |

त्रैमासिक वृत्तपत्रिका संपादक - श्री. विनय रघुनाथ राऊत

### ❖ नियुक्त सभासद ❖

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. राजाराम रघुनाथ पाटील | श्री. सुरेश परशुराम पाटील | श्री. भुवनेश्वर मुकुंद राऊत | श्रीम. दिपा देवेंद्र राऊत |
| श्री. बळवंत यशवंत राऊत | श्री. संजय नारायण पाटील | श्री. जयवंत आत्माराम पुरव | श्रीम. रुपा विनय राऊत |
| श्री. संदेश लक्ष्मीकांत राऊत | श्री. नरेंद्र परशुराम पाटील | श्री. तरंग जयप्रकाश पाटील | श्रीम. वनिता सूर्यकांत चौधरी |
| श्री. चंद्रकांत वामन पाटील | श्री. दिनेश वासुदेव पाटील | श्री. दिलिप हरिश्चंद्र पाटील | श्रीम. कल्पना किशोर राऊत |
| श्री. मधुकर नाना पाटील | श्री. बिपिनचंद्र यशवंत पाटील | श्रीम. नूतन नरेंद्र राऊत | श्रीम. विनिता अजय राऊत |

### ❖ विशेष निमंत्रित ❖

| | | | |
|---|---|---|---|
| श्रीम. शालीनी शामराव पाटील | श्रीम. ईशा अभिजित राऊत | श्री. दामोदर हरीश्चंद्र पाटील | श्री. गोपिनाथ ठक्या पाटील |
| श्रीम. हर्षला हरिश्चंद्र राऊत | श्रीम. मेघा रोशन पाटील | श्री. जयेश रामचंद्र राऊत | श्री. प्रशांत रघुवीर पाटील |
| श्रीम. सुचिता प्रवीण पाटील | श्रीम. दर्शना दिनेश पाटील | श्री. जितेंद्र रमाकांत पाटील | |

### ❖ पदसिद्ध सभासद (माजी विश्वस्त) ❖

| | | |
|---|---|---|
| श्री. शंकरराव नारायण राऊत | श्री. हरिश्चंद्र माधव पाटील | श्री. रामचंद्र बाळकृष्ण पाटील |
| श्री. भालचंद्र मुकुंद राऊत | श्री. लिलाधर त्रंबक चौधरी | श्री. वसंत हरिभाऊ राऊत |
| श्री. श्रीनिवास काशिनाथ पाटील | श्री. दिनेश रामजी पाटील | श्रीमती शालिनी लक्ष्मण पाटील |

## ❖ पदसिद्ध सभासद (माजी अध्यक्ष)❖

श्री. काशिनाथ बाळा राऊत
श्री. माधवराव रामजी पाटील
श्री. रघुनाथ सखाराम राऊत
श्री. बाळकृष्ण नथुराम राऊत
श्री. राजीव यशवंत पाटील
श्री. सतीश मधुकर राऊत
श्री. श्रीकांत लक्ष्मण राऊत
श्री. जयवंत गंगाधर चौधरी
श्री. शशांक रघुवीर पाटील
श्री. जयप्रकाश देवजी राऊत
श्रीम. दामिनी गोपिनाथ राऊत
श्री. सुधीर आत्माराम राऊत
श्री. अशोक नारायण पाटील

## ❖ शाखाध्यक्ष व शाखाचिटणीस ❖

| शाखा | शाखाध्यक्ष | शाखाचिटणीस |
|---|---|---|
| नरपड | श्री. सुरेश जगन्नाथ पाटील | श्रीम. नम्रता संग्राम राऊत, श्री. धीरज दिनेश पाटील |
| वरोर | श्रीम. अश्विनी समीर राऊत | श्रीम. मिनल प्रकाश राऊत, श्रीम. रुपाली पंकज राऊत |
| चिंचणी/तारापूर | श्री. हर्षद रघुनाथ राऊत | श्री. जयेश रमेश राऊत |
| घिवली | श्री. निलेश सदानंद पाटील | श्री. हार्दिक दितेंद्र पाटील, श्रीम. तृप्ती नरेंद्र पाटील |
| पोफरण | श्री. जयेश रमेश पाटील | श्री. विरेंद्र बाबूराव पाटील |
| सालवड | श्री. आनंद यशवंत राऊत | श्री. विवेक प्रकाश राऊत, श्री. दीपक हरिश्चंद्र पाटील |
| बेटेगाव | श्री. सुरेश वामन पाटील | श्री. केवल हेमंत पाटील |
| नांदगाव | श्री. वृक्षित सुरेंद्र पाटील | श्री. धीरज प्रशांत पाटील |
| पंचाळी | श्री. जयेंद्र भालचंद्र पाटील | श्री. मिनेश नरेंद्र पाटील, श्री. जिघ्नेश दीपक पाटील |
| उमरोळी | श्री. योगेश विनोद राऊत | श्री. हार्दिक सुधाकर राऊत, श्री. अनिकेत अशोक राऊत |
| पालघर | श्रीम. कविता किशोर ठाकूर | श्रीम. ज्योती कल्पक राऊत |
| कमारे | श्री. धनंजय यशवंत पुरव | श्री. प्रियाल रमेश पुरव |
| अल्याळी | श्री. योगेश मोरेश्वर ठाकूर | श्री. साहिल राजेंद्र पाटील |
| शिरगाव | श्री. निलेश भास्कर राऊत | श्री. कांचन मोरेश्वर राऊत |
| माहीम | श्रीम. राजश्री राजेश राऊत | श्रीम. निशा नंदकुमार पाटील, श्रीम. हेमाली हरिहर राऊत |
| केळवे | श्रीम. कृपाली मुकेश पाटील | श्रीम. हेमाली सुजीत पाटील |
| मधुकरनगर | श्री. जयवंत प्रभाकर पाटील | श्री. विजय गोविंद पुरव |
| मांडे | श्री. कामनीष संजय राऊत | श्री. कुंजल भूपेश राऊत |
| विरार/भाईंदर | श्रीम. प्रविणा राजेंद्र पुरव | श्री. भौतेष दिनेश पाटील, श्रीम. कुंदबाला सुधाकर पाटील |
| बोरीवली/दहिसर | श्री. रमाकांत नारायण पाटील | श्री. विजय जनार्दन राऊत |
| कांदिवली/गोरेगाव | श्री. किशोर जनार्दन राऊत | श्री. दीपक पांडुरंग पुरव |
| अंधेरी/जोगेश्वरी | श्री. सुरेश शाळीग्राम पुरव | श्री. प्रकाश नारायण पाटील |
| सांताक्रुझ, जुहू, विलेपार्ले | श्रीम.स्नेहल सुनिल राऊत | श्रीम. कामिनी जगन्नाथ पाटील |
| | | श्रीम. विशाखा विनोद पाटील |
| माहीम-दादर | श्री. विवेक बाबूराव राऊत | श्री. विश्वजीत अरुण राऊत |
| कुर्ला/मुलुंड | श्री. दिलीप जनार्दन पुरव | श्री. हेमंत गोपिनाथ राऊत |
| ठाणे/कल्याण | श्री. धनेश सखाराम राऊत | श्री. रमेश तुकाराम राऊत |

## ❖ अंतर्गत हिशेब तपासनीस ❖

श्री. किशोर हरीश्चंद्र राऊत
श्री. रोशन नारायण पाटील

# अध्यक्ष - परिचय



**श्री. पराग परशुराम राऊत** हे समाजसेवक सौ. सुलोचना व श्री. परशुराम पांडुरंग राऊत यांचे सुपुत्र. त्यांचा जन्म दि. १५ ऑक्टोबर १९६३ रोजी झाला. दहावीमध्ये राज्यात पहिल्या १०० मध्ये आल्याने पुढील शिक्षण नॅशनल टॅलेंट स्कॉलरशिपवर झाले. अभियांत्रिकी शिक्षण वाराणसी येथे आय.टी.बी.एच.यू (आताचे आय.आय.टी.–बी.एच.यू) मधून पूर्ण केले. पत्त्यांच्या खेळातील आंतरराष्ट्रीय प्रसिद्धीचा खेळ ''ब्रिज''मध्ये त्यांनी रेल्वेच्या अखिल भारतीय स्पर्धेतही अव्वल स्थान पटकावले. भारताच्या नॅशनल चॅम्पियन स्पर्धेमध्ये पहिल्या आठ संघामध्ये स्थान प्राप्त करुन देखील परीक्षेला बसणे अनिवार्य झाल्यामुळे अंतिम फेरीच्या बाहेरच रहावे लागले. १९८९ मध्ये ते युवक मंडळाचे अध्यक्ष होते.

मुंबईला आल्यावर एक वर्ष खाजगी संस्थेत काम करुन ते महानगर पालिकेत रुजू झाले ते आजपर्यंत. सिव्हील इंजिनीयरींगच्या सर्व क्षेत्रात ते पारंगत आहेत. कोर्टातील महानगर पालिकेच्या कित्येक जनहीत याचिकांमध्ये त्यांनी कौशल्याने विजय प्राप्त करुन दिला आहे. मासिक कोट्यावधी रुपयाच्या पगाराच्या नोकरीचे आमिष असताना केवळ सामाजिक बांधिलकी म्हणून ते अजूनही शासकीय सेवेतच आहेत. त्याचाच सन्मान म्हणून गृहनिर्माण तसेच उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री आणि रत्नागिरीचे पालक मंत्री श्री. रविंद्र वायकर ह्यांनी शपथ घेतल्यानंतर दुसऱ्याच दिवशी त्यांना विशेष कार्य अधिकारी म्हणून खास बोलावून घेतले. आज ते राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांमध्ये सहभागी होतात.

गोरेगाव येथील मालवणी जत्रोत्सवाचे ते अध्यक्ष आहेत. बेस्ट नगर, गोरेगाव येथील गणेशोत्सवास त्यांच्या नियोजनामुळे दहा वर्षात शेकड्याहून जास्त बक्षिसे मिळाली आहेत. आपल्या वरोर येथील गावी त्यांनी शेती करण्यास सुरुवात केली आहे. आपल्या संघाच्या प्रेरणेतून स्थापन झालेल्या सो.पा.क्ष.स. पतसंस्थेच्या आजच्या आर्थिक स्थितीस त्यांचा मोठा हात आहे. त्यांच्या नियोजन, धोरणीपणा व दूरदृष्टीमुळे आज पतपेढीला केवळ दहा लाख रुपयांच्या मोबदल्यात किमान चाळीस लाखाची वास्तू प्राप्त झाली आहे.

त्यांच्या नियोजनाचेच उदाहरण म्हणजे सर्व साधारण सभेतच जाहीत करण्यात आलेली १ ऑगस्टची पदाधिकाऱ्यांची सभा. त्या सभेतून निष्पन्न झालेले कार्यक्रम आपल्यासमोर आलेच आहेत. संपूर्ण वर्षाचे नियोजन त्यांनी आपल्या समोर ठेवले आहे. कामातील किंवा व्यवहारातील पारदर्शकता हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. सर्वांना समावून घेणे व सर्वांची मते विचारात घेणे हे त्यांच्या कामाच्या पद्धतीचे एक अंग आहे.

अशा ह्या अध्यक्षांचे अभिनंदन.

**अध्यक्षीय उपक्रमाची माहिती (दि. १-९-२०१५ पर्यंत)**

१ ऑगस्ट २०१५ – १ ली पदाधिकारी सभा, दहिसर
१४ ऑगस्ट २०१५ – नांदगाव, सालवड, बेटेगाव, उमरोळी येथे भेट
१५ ऑगस्ट २०१५ – शिरगाव, अल्याळी, पालघर, कमारे येथे भेट
१५ ऑगस्ट २०१५ – २ री पदाधिकारी सभा, पालघर
१६ ऑगस्ट २०१५ – माहीम, केळवे, मधुकरनगर, मांडे येथे भेट


# अभिनंदन




**सौ. प्रविणा हितेंद्र ठाकूर**
वसई–विरार शहर महानगरपालिकेत बिनविरोध नगरसेविका म्हणून निवडून आल्याबद्दल व महापालिकेत पहिल्या महिला महापौर झाल्याबद्दल.




**पंकज भास्कर ठाकूर**
मुंबई क्रिकेट असोसिएशन चे कार्यकारिणी सदस्य म्हणून व वसई विरार शहर महानगर पालिकेत नगरसेवक म्हणून निवडून आल्याबद्दल.



**श्री. प्रशांत राऊत**
वसई विरार शहर महानगर पालिकेत नगरसेवक म्हणून निवडून आल्याबद्दल.




**श्री. हार्दिक रविंद्र राऊत**
वसई विरार शहर महानगर पालिकेत नगरसेवक म्हणून निवडून आल्याबद्दल.



**श्री. शार्दुल नरेंद्र ठाकूर**
भारत 'अ' क्रिकेट संघात निवड झाल्याबद्दल




**डॉ. प्रशंसा संतोष राऊत**



**डॉ. साईज्योत संतोष राऊत**



**कु. मधुरा विलास राऊत**



**कु. अद्वैत सचिन पाटील**

- **डॉ. प्रशंसा संतोष राऊत** हिने प्रवरा इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्स या विद्यापीठातून MBBS पूर्ण केल्यानंतर त्याच विद्यापीठून Diploma in Obsterics and Gynaecology मध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाल्याबद्दल.
- **डॉ. साईज्योत संतोष राऊत** याने डी.व्हाय.पाटील मेडीकल कॉलेज, कोल्हापूर येथील विद्यापीठातून MBBS चे शिक्षण पूर्ण केले व आता बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा सेंटर, गोरेगाव येथील मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयात कार्यरत आहे.
- **मधुरा विलास राऊत** हिचे **'एका तरुणीचा प्रवास'** ह्या विषयावरील चित्रांचे प्रदर्शन दिनानाथ आर्ट गॅलरी अंधेरी स्पोर्टस कॉम्पलेक्स येथे ८ ते १५ जुलै २०१५ रोजी दरम्यान भरवण्यात आले होते. लोकनेते हितेंद्र ठाकूर, राजीवजी पाटील, आदेश बांदेकर, कर्सन घावरी आदि मान्यवरांना हे प्रदर्शन पाहिले. मधुरा हि ह्याचवर्षी BE (Comp)

प्रथमवर्गात उत्तीर्ण झाली असून पुढील शिक्षणासाठी (MS) ती युनव्हिर्सिटी ऑफ साऊदर्न कॅलिफोर्निया लॉसएंजल्स, अमेरिका येथे रवाना झाली आहे.

- **अद्वैत सचिन पाटील** – डहाणू तालुक्यातुन माध्यमिक शालांत (S.S.C. 95.8%) परिक्षेत सर्वप्रथम आल्याबद्दल. अद्वैत हा माजी अध्यक्ष अशोक ना. पाटील व माजी म.वि.समिती अध्यक्षा शैलजा अशोक पाटील यांचा नातू.
- **सौ. निलम विकास राऊत** – माहीम गावाच्या सरपंच पदी निवड झाल्याबद्दल
- **श्री. अजय भास्कर राऊत** – पालघर जिल्हा शारीरिक शिक्षक संघाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल
- **श्री. वंदेश देवजी पुरव** – यांचे माझे मूल्यांकन इ. ५ वी चे इंग्रजी विषयावरील पुस्तक प्रसिद्ध झाल्याबद्दल

| | | |
|---|---|---|
| • श्वेता मुकुल पाटील | M.S. (Chapman University California) | दादर (चिंचणी) |
| • विनित दिलीप राऊत | M.E. (Computer Engg.) | |
| • अस्मिता विनय पाटील | MBA(HR) | सालवड |
| • आकांक्षा भुषण पाटील | B.E. (Electronics & Telecommunication) | दहिसर (अल्याळी) |
| • नमिता राजेंद्र राऊत | B.E. (Electronics) | अल्याळी |
| • हिना किशोर राऊत | B.E. (Computer Engg.) | अल्याळी |
| • रविना देवेंद्र पाटील | B.E. (Information Technology) | नरपड |
| • तनय नयनीत राऊत | B.E. (Computer Engg.) | उमरोळी |
| • लाभेश शिवाजी पाटील | B.E. | पंचाळी |
| • सुशांत सतीश पाटील | B.E. | पालघर |
| • केयूर जयप्रकाश पाटील | B.E. (Civil) | वरोर |
| • भाविका देवेंद्र राऊत | B.E.( Information Technology) | मधुकरनगर |
| • तेजस्वी विकास राऊत | B.E. (Electronics) | सालवड |
| • वरदा वंदेश पुरव | BFA (Batchler of Fine and Applied Art) | बोरिवली (म. नगर) |
| • अंकिता दिपक राऊत | Dipl. in Environmental pollution Control | दहिसर (नरपड) |
| • जुई भुपेश राऊत | Dipl. (Comp. Technology) | मांडे |
| • प्रियाल सुजित पाटील | Dipl. (Industrial Electronics ) | केळवे |
| • तन्वी रविंद्र राऊत | Dipl. (Comp. Engg.) | उमरोळी |
| • चिराग संदेश पाटील | B.Com | कमारे |
| • केवल मंगेश पुरव | B.Com | कमारे |
| • मधुरा राजेंद्र राऊत | B.A. | अल्याळी |
| • प्रांजल राजेंद्र पाटील | B.A | अल्याळी |
| • मुग्धा बिपिन राऊत | महाराष्ट्र टॅलेंट सर्च (MTS)२१ वा क्रमांक | विरार (अल्याळी) |
| • विभूती अजय पाटील | शिष्यवृत्ती परीक्षा उत्तीर्ण (४ थी ) | |
| • आर्यन नितीन पुरव | शिष्यवृत्ती परीक्षा उत्तीर्ण (४थी) | जोगेश्वरी (म.नगर) |


## १२ वी

| | | |
|---|---|---|
| दैविक प्रविणकुमार पाटील | ८८.३१% | नरपड |
| शार्दुल विश्वनाथ पाटील | ८५.८५% | दहिसर (नरपड) |
| निराग मीनेश राऊत | ७७.५३% | चिंचणी |
| निकी राजेंद्र पाटील | ७७.५३% | घिवली |
| साहील राजेंद्रकुमार राऊत | ७७.२३% | नरपड |
| क्षितीजा विकास राऊत | ७७% | ठाणे (नरपड) |
| रिद्धी हेमंत राऊत | ७४.४६% | माहिम |
| राजस बिपिनचंद्र पाटील | ७३.६९ | विरार (वरोर ) |
| मित राजेंद्र राऊत | ७२% | विरार (नरपड) |
| राजीव दिपक राऊत | ७०.७७% | चिंचणी |
| नेहा महेश राऊत | ७०.७७% | |
| निलांगी निलेश राऊत | | पोफरण |
| धनुषा जयेंद्र राऊत | | नरपड |
| सायली प्रदीप राऊत | | नरपड |
| आदित्य प्रदीप पाटील | | म.नगर |
| किमया रामचंद्र पाटील | | पंचाळी |
| दिशा प्रमोद पाटील | | पंचाळी |
| धिरज धनेश ठाकूर | | पंचाळी |
| तेजल सुशील पाटील | | पंचाळी |
| मयांक उदय राऊत | | नरपड |
| सुयोगी विनय पाटील | | सालवड |

## १० वी

| | | |
|---|---|---|
| अद्वैत सचिन पाटील | ९५.८% | नरपड |
| सलोनी वंदेश पुरव | ९३% | म.नगर |
| श्रेया राजेश पाटील | ९२.४% | घिवली |
| हेमांग हर्षद राऊत | ८९.४% | बोरिवली(नरपड) |
| आशीर्वाद देवेंद्र पाटील | ८८.४% | अल्याळी |
| अन्वित राजेश पाटील | ८८% | बोरिवली(नरपड) |
| अपुर्व राजेश पाटील | ८६.८० | अल्याळी |
| साईराज मिलिद राऊत | ८६.२% | नरपड |
| दुहिता भुपेंद्र राऊत | ८६% | नरपड |
| मिहिर दिलीप राऊत | ८४% | नरपड |
| हर्ष अविनाश ठाकूर | ८३.४% | पंचाळी |
| शर्वरी हेमंत पाटील | ८०% | अल्याळी |
| अथर्व जीतेन राऊत | ८०% | नरपड |
| जुईली भरत राऊत | ८०% | अल्याळी |
| ईशा मनोज राऊत | ७८% | विरार (अल्याळी ) |
| सानिया संजय पाटील | ७८% | अल्याळी |
| प्राप्ती विनय पाटील | ७७.८% | अल्याळी |
| आदित्य संजय पाटील | ७७.८% | नांदगाव |
| मिनार संजय राऊत | ७५% | अल्याळी |
| मेहुल जितेंद्र राऊत | ७५% | अल्याळी |
| सागर ललीत राऊत | | नरपड |
| अदित क्रांतिकुमार पुरव | | म. नगर |

# सर्व सभासदांना हितचिंतकाना सो.पा.क्ष.स.संघाकडून गणेशोत्सवाच्या शुभेच्छा





**कै. लिला हरेश्वर राऊत**




**श्री.हरेश्वर आप्पा राऊत**

कै. लिला हरेश्वर राऊत ह्यांच्या स्मरणार्थ
श्री. हरेश्वर आप्पा राऊत, माहिम ह्यांजकडून
बहुउद्देशीय वास्तुनिधी साठी
रु. १,००,०००/-



**कै. पुष्पा पुरुषोत्तम राऊत**



**श्री.पुरुषोत्तम पांडुरंग राऊत**

कै. पुष्पा पुरुषोत्तम राऊत ह्यांच्या स्मरणार्थ
श्री. पुरुषोत्तम पांडुरंग राऊत,मीरारोड (नरपड)
ह्यांजकडून बहुउद्देशीय वास्तुनिधी साठी
रु. १५,०००/-

(अहवाल छपाई च्या वेळेस नजर चुकीने राहिलेली छपाई)

## आवाहन

- **वास्तुनिर्मिती निधी** - संघाने समाजाची वास्तु होण्यासाठी ठोस पावले उचलली आहेत. वास्तु निर्मिती निधी साठी समाजबांधवांनी सढळ हस्ताने भरघोस मदत करावी हि विनंती.
- **त्रैमासिक वृत्तपत्रिका निधी** - आपणास माहीतच आहे की वृत्तपत्रिका छपाई खर्च व वितरीत करण्याचा खर्च वाढतच आहे. सर्व समाजबांधवांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्रैमासिक वृत्तपत्रिका निधी साठी वाढदिवस, लग्न, गौरव इ. नैमत्तिक निमित्ताने देणगी अथवा जाहिरात द्यावी. नैमत्तिक देणगी कमीत कमी रु. २०० व त्यानंतर रु. १०० च्या पटीत स्वीकारली जाईल.
- **शैक्षणिक मदत परतफेड** - सर्व समाज बंधू भगिनींना नम्र विनंती आहे की संघातर्फे वेळोवेळी करण्यात आलेली शैक्षणिक मदतीची परतफेड करावी.

सर्व शाखाध्यक्ष, शाखाचिटणीस व पदाधिकाऱ्यांना विनंती आहे की,दिनांक १३-९-२०१५ च्या व्यवस्थापक मंडळाच्या सभेतुन पावतीपुस्तके घेऊन जावीत व २८-२-२०१६ पूर्वी खजिनदारांकडे जमा करावीत.

# क्षात्रैक्य परिषद

क्षात्रैक्य परिषदेची ६५  वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि. २३ – ८–२०१५ रोजी छबिलदास शाळा, दादर येथे पार पडली. २०१५–२०१७ साली नविन कार्यकारिणी सदस्यांची निवड ह्या वेळी झाली. सोपाक्षस संघाचे खजिनदार श्री. विजय द. पाटील यांची अध्यक्षपदी, श्रीम. वैजंयती वि. पाटील यांची खजिनदारपदी, श्री. विनय  रघुनाथ राऊत यांची मुख्य चिटणीस पदी तर श्री. संदेश लक्ष्मीकांत राऊत, श्रीम. वनिता सुर्यकांत चौधरी व श्रीम. कल्पना किशोर राऊत यांची व्यवस्थापक मंडळात निवड झाली. सर्वांचे अभिनंदन

---


क्षात्रैक्य परिषदेतर्फे ७ जून २०१५ रोजी पं.वि. अरविंद हरी राऊत जन्मशताब्दी वर्षाचा संगाता समारंभ प्रबोधनकार ठाकरे नाट्यगृह बोरीवली येथे आयोजित करण्यात आला. समारंभासाठी क्षात्रैक्य परिषदेचे अध्यक्ष अशोक घरत, सो.पा.क्ष.स.संघाचे अध्यक्ष अशोक पाटील, मा. आमदार सौ. मनिषाताई चौधरी, ज्येष्ठ पत्रकार व लोकसत्तेचे माजी संपादक श्री. अरुण टिकेकर आदि मान्यवर उपस्थित होते. या निमित्ताने 'अरविंद स्मृतिगंध' ह्या गौरव ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. ह्या कार्यक्रमाच्या निमित्ताने मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

क्षात्रैक्य परिषदेतर्फे दि. १/२ ऑगस्ट रोजी चौल, नांदगाव, मुरुड या गावात गरीब व गरजू विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आले. या निमित्ताने अलिबाग विभागातील क्षात्रैक्य परिवारातील समाजबांधवांचा परिचय झाला.

**दि. ११ ऑक्टोबर २०१५ रोजी क्षात्रैक्य परिषदेचा ६६ वा वर्धापन दिन दुपारी ३.३० वाजता अण्णासाहेब वर्तक सभागृह, दादर येथे आयोजित करण्यात आला आहे.** आपली उपस्थिती वंदनीय आहे.!

---


Nikunj Raut
9270175226
7507067836



HOTEL GULMOHAR


Family Restaurant
& Garden Bar

Lodging Boarding

Girish L. Raut
9850140780
7798421214

Trimurti Estate Agent
Mahalaxmi Transport

Building Material Suppliers



Near Sarpada Stop,  At & Post Umroli, Tal & Dist.-Palghar,

**संघाच्या अध्यक्षांनी अध्यक्षपदाची सूत्रे स्विकारताच दि. १-०८-२०१५ रोजी पदाधिकाऱ्यांची सभा घेतली. मान. अध्यक्षांच्या सुचनेनुसार पदाधिकारीच्या सभेचे इतिवृत्त विषयानुसार त्रैमासिक वृत्तपत्रिकेत देत आहेत.**

## बैठकीची कार्यवाही

बैठकीची सुरूवात राष्ट्रगीताने झाली. त्यानंतर डॉ. अब्दुल कलाम ह्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

समाज सविता डॉ. मधुकर बळवंत राऊत यांचे पुष्पहार घालून स्मरण करण्यात आले व अध्यक्षांनी त्यांच्या साक्षीने समाजसेवेचा वसा वाहण्याची शपथ घेतली.

**शपथ**

मी, पराग परशुराम राऊत, सोमवंशी पाठारे क्षत्रिय समाजोन्नती संघाने दिलेल्या मानाचा सन्मान राखीन व केवळ समाजाच्या व्यापक हितासाठी झटून काम करीन अशी शपथ डॉ. मधूकर बळवंत राऊत यांच्या साक्षीने घेत आहे.

त्या नंतर सभेस सुरूवात करण्यात आली. श्री. विजय दशरथ पाटील व श्री. विनय रघुनाथ राऊत यांची रजा मंजूर करण्यात आली.

**१. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे पुण्यस्मरण करणे.**

अध्यक्षांनी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे स्मरण करण्यास सांगितले. स्मरणानंतर श्री. वंदेश देवजी पुरव ह्यांनी लो. टिळकांबद्दल दोन शब्द सांगितले. त्यानंतर सर्व उपस्थितांनी स्वातंत्र्याचा मान ठेवण्याचा निश्चय केला.

**२. सर्व कार्यक्रमांमधे राष्ट्रगीताने सुरूवात करण्याबाबत निर्णय घेणे.**

अध्यक्षांनी सांगितले की शासनाच्या नविन निर्णयानुसार सर्व औपचारीक कार्यक्रम, सर्व सभा तसेच अधिवेशनांची सुरूवात राष्ट्रगीताने करणे गरजेचे झाले आहे. चित्रपटगृहातही चित्रपटापूर्वी राष्ट्रगीत म्हटले जाते. परंतु शासकीय वेबसाईटवरून त्याबाबत माहीती प्राप्त होऊ शकली नाही. त्या अनुशंगाने शासन निर्णय प्राप्त करण्याचे ठरले. तसा निर्णय घेण्याची व त्याची अंमलबजावणी करण्याची शिफारस करणे पुढील बैठकीत ठेवण्याचे ठरले.


# त्रैमासिकपत्रिका जाहिरात दर

**वार्षिक (चार अंकासाठी)**

पाव पान - १५०० रु. ● अर्धे पान - ३००० रु. ● पूर्ण पान - ५००० रु.

वधु वर जाहिरात (पाव पान) ३०० रुपये ● त्रैमासिक निधी - २०० रु. व पुढे १०० च्या पटीत

**सो. पा. क्ष. स. संघाची सभासद वर्गणी** अधिदाता रु. ५,०००/-,
वाली रु. २,०००/-, पालक १,०००/- आश्रयदाता रु. ५००/-, कायम रु. २००/-

**३. व्यवस्थापक मंडळाच्या सर्व सभांची तारीख निश्चित करणे.**

अध्यक्षांनी व्यवस्थापक मंडळच्या सभांची तारीख पूर्व नियोजीत असण्याची गरज समजावून सांगितली. व्यवस्थापक मंडळापुढील विषय सर्व सभासदांच्या हिताचे असल्याने सभेपूर्वी सूचना मागविण्याचे आवाहन करण्यास सांगितले. त्यामुळे ऐन सभेत होणाऱ्या चर्चा कमी होतील व सभेस जास्त वेळ उपलब्ध होईल असेही ते म्हणाले. ही पद्धत सर्वच समित्यांसाठी योग्य होईल असे ठरले व सभेची सूचना तीन आठवडे आधी विषयपत्रिकेसह जाहीर करण्याचे ठरले.

व्यवस्थापक मंडळाच्या सभेस बरेच सभासद रविवारी सुट्टी नसल्याने उपस्थित राहू शकत नाहीत असे सांगण्यात आले. त्या सभासदांनी काही सभा शुक्रवारी घेण्याची विनंती केली आहे असेही सांगण्यात आले. त्यावर अध्यक्षांनी काही अतिरीक्त सभा घेणार असल्याचे सांगितले.

त्या नंतर व्यवस्थापक मंडळाच्या सभांसाठी पुढील तारखा निश्चित करण्यात आल्या.

सर्व रविवार दि. १३ सप्टेंबर २०१५, १नोव्हेंबर २०१५,२१ फेब्रूवारी २०१६ व १ मे २०१६ तसेच अधिक सभा ऑगस्ट २०१५, २ ऑक्टोबर २०१५ (शुक्रवार) आणि १३डिसेंबर २०१५ रोजी व्यवस्थापक मंडळाच्या सभा घेण्याचे निश्चित केले. अध्यक्षांनी १४ ऑगस्ट ते १६ ऑगस्ट दौरा निश्चित झाल्यास तेव्हा अतिरिक्त सभा घेतली जाईल असे सांगितले.

**४. विविध समित्या व उपसमित्यांकडून अहवाल मागविणे.**

संघाच्या सभासदांना प्रत्येक समितीचे कामकाज कळणे गरजेचे आहे. प्रत्येक समितीने केलेले ठराव, संघाने नेमून दिलेली कामे ह्याचा पूर्तता अहवाल सर्व समित्यांनी देणे गरजेचे आहे. घटनेनुसार सर्व समित्यांचे अहवाल व्यवस्थापक मंडळाच्या सभेत येणे गरजेचे आहे. त्यामुळे शाखांमार्फत समित्यांच्या कामाची माहीती होईल.

प्रत्येक समितीला संघाच्या उद्दीष्टांची माहीती आहे. त्याप्रमाणे त्यांचे कामकाज होणे गरजेचे आहे. कृषी विकास समितीने त्याबाबतची माहीती करून देणे गरजेचे आहे. शासनाच्या कृषी विभागाकडून उपलब्ध होणारे बियाणे, खते, किटक नाशके तसेच अंशदान, अवजारे, यंत्रे इ. ची माहीती देणे आवश्यक आहे. त्याकरीता समितीने शासनाच्या त्या विभागाशी व अधिकाऱ्यांशी संपर्कात रहाणे गरजेचे आहे. अवजारे, यंत्र मिळण्याची


Hero

**Kundan Raut**
Sales Manager

**STS Automobiles**
Authorised Dealer Hero Motocrop Ltd.
Shop No. 23, Riddhi Siddhi Bldg.,
Near HDFC Bank,
Kardal, Saphale (E), Tal. & Dist. - Palghar

M. 9226276822 / 9545978689
Eamil : kundanraut50@gmail.co,m

ठिकाणे तसेच अंशदान मिळविण्याच्या पद्धती सभासदांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी ह्या समितीने घेतली पाहिजे. तसेच व्यापार, उद्योग विकास व सहकार समितीनेही शासनाच्या धोरणांची माहीती मिळवून ती सभासदांपर्यंत पोहोचविणे गरजेचे आहे. समित्यांनी आपल्या सभेच्या तारखा निश्चित करून सर्व सभासदांना कळविल्यास ते समितीपुढे आपल्या सूचना व असलेली माहीती देऊ शकतील. सर्व समित्यांचे अहवाल व पुढील सभेच्या तारखा मागवून त्यांची प्रसिद्धी करण्यासाठी सर्व समित्यांच्या निमंत्रकांना कळविण्याचे मुख्य सचिवांना सांगण्यात आले.

**५. वार्षिक अधिवेशनाच्या तारखा सूचविणे**

वार्षिक अधिवेशन नांदगांव येथे होणार आहे. श्री. राजीव यशवंत पाटील ह्यांनी जानेवारीचे शेवटचे ते फेब्रूवारीचे सुरूवातीचे आठवडे ह्या दरम्यान अधिवेशन घेण्यात येईल असे अध्यक्षांनी जाहीर केले आहे. त्यानुसार संघाच्या परंपरेनुसार मकर संक्रांतीनंतर पौष महिन्यात लग्नाचे मुहूर्त नसणारे दिवस सूचविण्याचे ठरले. १७, २४ जानेवारी किंवा ७ फेब्रूवारीस मूहूर्त नसून बाकी सर्व रविवारी मूहूर्त आहेत असे अध्यक्षांनी सांगितले. उपाध्यक्षांनी ह्या तारखा शाखेस कळवून लवकरात लवकर निर्णय कळविण्यास सांगितले.

**६. अध्यक्षांच्या दौऱ्यांच्या तारखा निश्चित करणे.**

अध्यक्षांनी सर्व शाखांना किमान दोनदा भेट देण्याचा प्रयत्न असेल असे सांगितले. त्यानुसार पहीला दौरा ऑगष्टच्या दुसऱ्या आठवड्याच्या शेवटी असेल असे सांगितले. १४, १५ व १६ ऑगस्ट रोजी पहीला दौरा काढण्याचे ठरले. तीन दिवसांत सर्व गावे होऊ शकत नाही, त्यामुळे वरोर व नरपड ह्या गावांचा दौरा वेगळा करणार असल्याचे अध्यक्षांनी सांगितले. ज्या पदाधिकारी, सभासदांना ज्या दिवशी शक्य असेल तेव्हा दौऱ्यास यावे असे त्यांनी आवाहन केले. दुसरा दौरा १ नोव्हेंबर ते ५ नोव्हेंबरच्या दरम्यान तर त्यानंतरचा दौरा फेब्रूवारीच्या शेवटच्या आठवड्यात किंवा मार्चच्या पहील्या आठवड्यात करण्याचे सूचीत केले. कोजागिरी निमित्ताने दि. २४ ऑक्टोबर २०१५ रोजी नांदगाव, शिरगांव किंवा इतर समुद्रकिनारी गायनाचा कार्यक्रम आयोजित करून ते गाव पर्यटनाच्या कक्षेत आणणे ह्याबाबत चर्चा झाली.

**७. संघाच्या २०१५-२०१६ मधिल विविध कार्यक्रमांबाबत निर्णय घेणे.**

अध्यक्षांनी पुन्हा एकदा आगाऊ योजना करण्यास प्राधान्य देण्याची आठवण करून दिली. सर्व समित्यांनी आपापले कार्यक्रम करावे असे अध्यक्ष म्हणाले. युवा विकास समिती व महिला विकास समितीच्या मेळाव्यांची तारीख ठरवावी असे ठरले. ह्या समित्यांनी मेळावे डिसेंबर व जानेवारी महिन्यात घ्यावे असे अध्यक्ष म्हणाले. ह्यापूर्वी महिलांनी संघाच्या अधिवेशनाला लाजवेल अशा संख्येने मेळावे भरविल्याबद्दल समितीचे कौतुक केले. श्रीमती दामिनी राऊत ह्यांनी महिला मेळाव्या करीता मधुकरनगर शाखेशी चर्चा सूरु असल्याचे संगितले.

अध्यक्षांनी आरोग्य विकास समितीने शासनाच्या सामाजिक आरोग्य खात्याच्या मदतीने कार्यक्रम आखावा असे

सांगितले. त्यामुळे शासनाच्या धोरणांची माहीती मिळेल व सभासदांचे स्वास्थ्य राखण्यास मदत होईल असे सांगितले. तारापूर येथिल अणूभट्टीचे परिणाम आपल्या भागात होत आहेत. शासनाच्या धोरणानुसार सामाजिक दायित्वापोटी २% रक्कम खर्च करणे आवश्यक आहे. ही रक्कम कोठे खर्च केली जाते ते पाहून त्या रक्कमेतून आरोग्य चिकित्सा करून घ्याव्या असे अध्यक्ष म्हणाले. जैतापूर प्रकल्पास शिवसेनेकडून विरोध केला जात आहे. गृहनिर्माण राज्यमंत्री हे रत्नागिरीचे पालकमंत्रीही आहेत. त्यामुळे त्यांना अभ्यास दौऱ्याची विनंती केली असून त्यांनी आपल्या भागात दौरा करण्याचे मान्य केले असल्याचे अध्यक्षांनी सांगितले.

अध्यक्षांनी कृषी विकास समिती मार्फत कृषी मेळावा भरवू असे सांगितले. वरोर अधिवेशना दरम्यान आपण मेळावा भरविण्यास प्रयत्नशिल होतो पण वेळेअभावी ते शक्य झाले नाही असेही ते म्हणाले. मेळाव्यामधे शासनाचे कृषी उद्योग भवन, कृषी विभाग, अवजारांचे कारखानदार, विक्रेते यांच्या सहभागाने पास्थळ, बोईसर येथिल क्रिडांगणात मेळावा घेण्याचा मानस व्यक्त केला. हा मेळावा आपल्या संघामार्फत भरविला तरी सर्वांसाठी खुला ठेवल्याने संघाच्या लोकसेवेच्या कामामुळे शिरपेचात मानाचा तुरा खोचला जाईल असे ते म्हणाले. शेतीसाठी बहुउपयोगी १५ HP पॉवर टिलर, सर्व जोडण्यांसह रू. १,३२,००० मधे प्राप्त होतो व त्यातील रू. ५२,००० अंशदान मिळते. समितीद्वारे ह्याची संपूर्ण माहीती सभासदांना पुरविण्यात येईल असे ते म्हणाले.

व्यापार,उद्योग विकास व सहकार समितीमार्फत मेळावा व मार्गदर्शन शिबीरे भरविण्यासाठी सर्व माहीती मिळवून कार्यक्रमाची रूपरेषा देण्याची जबाबदारी संघाचे माजी अध्यक्ष श्री. शशांक पाटील यांचे चिरंजीव कु. साहीलवर सोपविल्याचे अध्यक्षांनी सांगितले. राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत पहील्या क्षेत्रात (जंगली वस्तू गोळा करणे, शेती, खनीकर्म इ.), दुसऱ्या क्षेत्रात (बांधकाम, उत्पादन इ.) व तिसऱ्या क्षेत्रात (सेवा सुविधा पुरविणे इ.) असलेल्या विविध संधींबाबत साहीलकडून e-mail द्वारे त्याबाबत प्राप्त झालेले मुद्दे वाचून दाखविले. अध्यक्ष पुढे म्हणाले की पहील्या क्षेत्रात शेतीमधे उत्पादन वाढविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. यंत्रे, अवजारे, साधने महाग असल्यास एकत्रितपणे विकत घेऊन वापरता येतील. आपल्या शेतातील उत्पादनांस देशी व विदेशी बाजारपेठ मिळवण्याचा प्रयत्न केला पाहीजे. ताडीपासून निर्माण केलेली खाटी, नैसर्गिक विनेगार म्हणून विक्रीसाठी अंतरराष्ट्रीय बाजारात पोहोचविणे गरजेचे आहे. थरफळाच्या वड्यांची चव सर्व देशभर पसरवली पाहीजे. दुसऱ्या क्षेत्रात शासनाची कामे प्राप्त केली पाहीजेत. त्याकरीता साहीत्याचा पुरवठा करण्यात पुढाकार घेतला पाहीजे. तिसऱ्या क्षेत्रात सेवा पुरविण्यासाठी पुढाकार घेतला पाहीजे. बांधकामाच्या दर्जाची तपासणी करून प्रमाणित करणे हा एक चांगला उद्योग होऊ शकतो. श्री. दिनेश रामजी पाटील हे LIC मधे उच्च पदस्थ होते परंतु त्यांनी शेतीकडे पूर्ण लक्ष ठेवले व समाजसेवेतही पुढाकार घेतला. त्यांचा आदर्श लोकांनी डोळ्यासमोर ठेवावा.

इतर समित्यांनी आपापल्या कार्यक्रमांची रूपरेषा आखून ते व्यवस्थापक मंडळापूढे आणावे असे अध्यक्ष म्हणाले. त्यानुसार सर्व समित्यांच्या निमंत्रकांना कळविण्याचे मुख्यसचीवांना सांगण्यात आले.

**८ संघाच्या प्रसिद्धी पत्रकांचे स्वरूप निश्चित करणे.**

संघाच्या विविध कार्यक्रमांची माहिती देणारी पत्रके प्रसिद्ध करणे गरजेचे आहे. शासनाच्या माध्यमातून उपलब्ध करून दिलेल्या सोया / सुविधा / धोरण / निधी / अंशदान ह्याची माहिती देणारी पत्रके काढणे गरजेचे आहे. त्रैमासिक पत्रिकेची प्रसिद्धी लांब असल्यास सभासदांना उपयोगी माहीती मासिक पत्रिकेने देता येईल असे अध्यक्ष म्हणाले. सर्व समित्यांच्या कार्यक्रमांची माहिती देणारी पत्रके काढण्याबाबत त्रैमासिक पत्रिकेच्या संपादकांबरोबर चर्चा करून अहवाल प्राप्त करण्याचे ठरले.

**९. वाडवळ समाजाबद्दल संपूर्ण माहिती, चाली-रिती, राहणीमान, परंपरा व इतिहास जगासमोर आणणारे पुस्तक प्रसिद्ध करण्याबाबत चर्चा करून निर्णय घेणे.**

वाडवळांबद्दल जगाला सर्व माहीती करून देण्यासाठी पुस्तक प्रसिद्ध करण्याची कल्पना अध्यक्षांनी मांडली. आपल्या संघाच्या परंपरा, संस्कार अतिशय थोर असून आपल्याला त्याचा अभिमान आहे असेही ते म्हणाले. पुस्तकाची संपूर्ण जबाबदारी सौ. विजया जयवंत चौधरी व सौ. सुलोचना परशुराम राऊत यांनी घेण्याचे कबूल केले आहे. त्या पुस्तकाच्या सहसंपादनाचे काम पहातील. श्री. पराग परशुराम राऊत हे ह्या पुस्तकाचे संकल्पनाकार व मुख्य संपादक राहतील असे ठरले.

पुस्तकाचा प्रकाशक संघ असेल व ती जबाबदारी स्वीकारण्यास श्री. भरत ठाकूर ह्यांना विनंती केल्याचे अध्यक्षांनी सांगितले. सर्व पुस्तक एकत्रितपणे एक पुस्तकाच्या स्वरूपात असेल. विविध लेखक विविध भागांबद्दल लिहतील परंतु त्यांची नावे त्या त्या भागातील सहभागींमधे येतील असे ठरले. पुस्तकामधे वाडवळ शब्दाच्या उत्पत्तीपासून ते वाडवळांचा इतिहास, भौगोलिक व्याप्ती, गावांच्या रचना, घरांच्या रचना,कामधंदा, उद्योग, खाण्या-पिण्याच्या पद्धती, राहाणीमान, सण उत्सव व ते साजरे करण्याच्या पद्धती, परंपरा, पारंपारिकऔषधोपचार इ. बाबत माहिती अंतर्भूत असेल. संघ स्थापनेच्या दिवशी अर्थात ३ एप्रिल २०१६ रोजी पुस्तकाच्या प्रकाशनाचा प्रयत्न करण्याचे ठरले. त्यानुसार प्रारूप डिसेंबरपूर्वी संपविणे गरजेचे आहे असे ठरले.

**१०. तिमाही वृत्तपत्रिकेच्या प्रसिद्धीच्या तारखा निश्चित करणे.**

तिमाही पत्रिका वरील मुद्यांमधे चर्चा केल्याप्रमाणे प्रसिद्ध करणे गरजेचे आहे असे ठरले. संपादक त्यानुसार तारखा जाहीर करतील असे ठरले.

**११. पदाधिकारी मंडळाच्या सभांच्या तारखा निश्चित करणे.**

सर्व सभांपूर्वी दोन आठवडे,प्रत्यक्ष भेटीने किंवा अभिसरण पद्धतीने पदाधिकाऱ्यांच्या सभा घेण्याचे ठरले.

**१२. २०१३-२०१४ व त्या मागील सर्व साधारण तसेच व्यवस्थापक मंडळाच्या सभेतील निर्णयांच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.**

पुढील सभेत सर्व सभांचे ठराव घेऊन निर्णयांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्याचे ठरले.

**१३. संघाच्या घटना व नियमांचा तसेच पद्धतींचा आढावा घेण्यासाठी उपसमिती नेमणे.**

यापूर्वी संघाची घटना २००३ साली सुधारीत केली गेली. आता त्यास १२ वर्ष लोटली. माहीती तंत्रज्ञान कायदा त्यानंतर आला. माहीतीचा अधिकार आला. अशा सुधारणांचा योग्य विचार करून प्रस्ताव देण्याकरीता पाच जणांची उपसमिती नेमली जाईल. अध्यक्ष, विश्वस्त समिती अध्यक्ष व तीन नियुक्त सभासद असतील. नियुक्त सभासदांकरीता श्री. भरत ठाकूर, श्री.विजय दशरथ पाटील, श्री.जयवंत गंगाधर चौधरी, श्री. अशोक नारायण पाटील इ. नावांचा विचार करण्यात आला. नियुक्त सभासद त्यांच्या वैयक्तीक सहमतीने ठरविण्याचे ठरले. सध्याच्या तरतूदी, अंमलबजावणीची पद्धत ह्या सर्वबाबींचा अभ्यास करून अहवाल देईल.

**१४.वास्तू व इतर निधीतील वाढ करण्याकरीता धोरण आखणे.**

शासनाकडून भूखंड प्राप्त करण्यासाठी ह्यापूर्वी ठराव करण्यात आले आहेत. त्यानुसार मुंबई येथे म्हाडाला विनंती करून कल्याणकेंद्राच्या आरक्षणाचा भूखंड मागण्याचे ठरले. विरार-वसई भागात श्री. राजीव यशवंत पाटील यांचेकडे तगादा लावण्याचे ठरले. संघकार्यासाठी हॉल भिक्षेत मागण्यास आपल्याला लाज वाटणार नाही असे अध्यक्ष म्हणाले.

पालघर पूर्व येथिल अस्तित्वातील वास्तूसह विकास करण्याकरिता वास्तूविशारदाची नियुक्ती केल्या खेरीज अंदाज येणार नाही. आधी काम सुरू करून नंतर निधी उपलब्ध केला जाऊ शकतो. अध्यक्षांनी आपल्या मुलावर अशा प्रकारच्या विकासासाठी प्रस्ताव तयार करण्यास सांगितले असल्याची माहीती दिली. पालघर पश्चिम येथिल वास्तूसुद्धा सोबतच्या भूखंडासोबत विकास होत असल्यास प्रयत्न केला पाहीजे असे अध्यक्ष म्हणाले.

वास्तूनिधीच्या वाढीसाठी ठोस कार्यक्रम घेण्याचे ठरले. रू. २०००/- पेक्षा जास्त रक्कम देणाऱ्यास गाण्याच्या कार्यक्रमास मोफत प्रवेश. रू. ५०००/- पेक्षा जास्त रक्कम देणाऱ्यास चार जणांची मोफत प्रवेशिका देण्यासारखे प्रोत्साहन ठेवावे असे अध्यक्ष म्हणाले.

**१५. समाजातील अनन्य साधारण स्थान दिल्या गेलेल्या समाज धुरीणांसह इतर सर्व थोर समाज सेवकांचे (उदा. कै. ज. पा. राऊत) स्मरण करण्याकरीता एक दिवस स्मरणार्थ निश्चित करणे व तो साजरा करण्याबाबत निर्णय घेणे.**

समाजातील धुरीणांनी समाज सेवेस वाहून घेऊन आपल्याला योग्य दिशा दिली. त्यामुळेच आपण येथवर पोहोचलो. त्यामुळे त्यांच्या स्मरणार्थ एक दिवस निश्चित करून त्या दिवशी प्रत्येक शाखेने कार्यक्रम राबविणे तर त्यांची आठवण पुढील पिढ्यांनाही राहील म्हणून एक दिवस निश्चित करण्यावर पुढील सभेत प्रस्ताव आणण्याचे ठरले.

**१६. विश्वस्त व पदाधिकारी ह्यांनी किमान एका शाखेची देखरेख व मार्गदर्शनाचे पालकत्व/**

जबाबदारी घेणे.

माजी अध्यक्षांनी केलेल्या सूचने प्रमाणे पालकत्व घेण्याबाबत चर्चा पुढील सभेत करण्याचे ठरले.

**१७. आयत्यावेळी आलेले विषय**

खजिनदारांनी आपल्या जागेस महानगरपालिकेने वाणिज्य दराने घरपट्टी लावल्याचे पत्राद्वारे निदर्शनास आणून दिले. अध्यक्षांनी सांगितले की श्री. भरत ठाकूर हे ह्याचा पाठपूरावा करत असून योग्य कागद पत्रं सादर करण्यात येत असल्याचे सांगितले.

अहवालाच्या छपाईसाठी जवळपास रू. १,२०,०००/- खर्च आला असल्याचे व तो छापखान्याकडून कमी करून घेण्याचे प्रयत्न असल्याचेही खजिनदारांच्या पत्राद्वारे सभेला कळले. अध्यक्षांनी अहवालासाठीही जाहीराती घेतल्यास खर्चाचा भार कमी होऊ शकेल असे सांगितले. त्यानुसार त्रैमासिक वृत्तपत्र समितीने अहवाल द्यावा असे ठरले.

त्यानंतर सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे मुख्यचिटणीसांनी जाहीर केले.

---

**नैमत्तिक देणगी (त्रैमासिक वृत्तपत्रिका निधी)**

| | | |
|---|---|---|
| १. | सौ. समृध्दी संतोष राऊत, सालवड<br>डॉ. प्रशंसा व डॉ. साईज्योत यांच्या यशाबद्दल | रु. २०००/- |
| २. | ॲड. विलास लक्ष्मण राऊत , विरार (नरपड)<br>कुमारी मधुरा हिच्या यशस्वी चित्रप्रदर्शनाबद्दल | रु. १,०००/- |
| ३. | सौ. शैलजा अ. पाटील व सौ. सुचेता स. पाटील, नरपड<br>कु. अद्वैत इयत्ता १०वीत डहाणू तालुक्यात प्रथम आल्याबद्दल | रु. १,०००/- |
| ४. | सौ. उत्कर्षा वंदेश पुरव, बोरिवली (म.नगर)<br>कुमारी वरदा BFA झाल्याबद्दल | रु. ५००/- |

---

मान. अध्यक्षांच्या video conferencing या संकल्पने अंतर्गत शाखाध्यक्ष / शाखाचिटणीस यांना विनंती आहे की, त्यांच्याकडे अथवा शाखेतील ज्या व्यक्तीकडे mobile Internet आहे व त्यांचे नाव, मोबाईल नंबर, शाखेचे नाव video conf असे टाईप करुन ९८६९०१७६८२, ९८६९६६४००२, ८१४९०८१६०६, ९८२३२५१९४७ ह्या क्रमांकावर SMS करावा.

---

## त्रैमासिक वृत्तपत्रिका प्रकाशित करण्याचा तारखा

| कालावधी | संपादकांकडे माहीती पोहचवयाची तारीख | छपाई |
|---|---|---|
| जानेवारी ते मार्च | ०५ एप्रिल पर्यंत | २० एप्रिल |
| एप्रिल ते जून | ०५ जुलै पर्यंत | २० जुलै |
| जुलै ते सप्टेंबर | ०५ ऑक्टोबर पर्यंत | २० ऑक्टोबर |
| ऑक्टोबर ते डिसेंबर | ०५ जानेवारी पर्यंत | २० जानेवारी |

**आवश्यकता असल्यास अध्यक्षांच्या सुचनेनुसार अधिक वृत्तपत्रिका / पत्रक काढण्यात येईल.**

## श्रद्धांजली

| | नाव | गाव | तारीख | वय |
|---|---|---|---|---|
| १. | मोरेश्वर जगन्नाथ राऊत | वरोर | १५-५-२०१५ | ८८ |
| २. | विमल विनायक पाटील | बेटेगाव | १७-५-२०१५ | ६४ |
| ३. | सुषमा वसंत राऊत | म. नगर | १९-५-२०१५ | ७२ |
| ४. | भालचंद्र अनंत राऊत | नरपड | ४-५-२०१५ | ८० |
| ५. | सुरेश वामन पाटील | नरपड | १३-७-२०१५ | ७७ |
| ६. | रमेश चिंतामण पाटील | पंचाळी | ०३-७-२०१५ | ७२ |
| ७. | वसुधा वसंत पाटील | केळवे | २७-७-२०१५ | ६७ |
| ८. | मालती दामोदर राऊत | सालवड | ३०-७-२०१५ | ८८ |
| ९. | नर्मदा नारायण पाटील | पंचाळी | ०८-८-२०१५ | ८९ |
| १०. | सुजाता संजय पाटील | नांदगाव | २८-८-२०१५ | ४२ |
| ११. | मालती मुकुंद पाटील | सालवड | १-९-२०१५ | ८२ |
| १२. | काशिनाथ दाजी राऊत | नरपड | २-९-२०१५ | ८४ |

**१९९० पासून अविरत सेवा** **श्री. विश्वजीत अरुण राऊत**

# जीत फायनान्शियल सर्विसेस

**ONE STOP SOLUTION**

जीवन विमा / मेडीक्लेम / म्युचअल फंड/ शेअर्स पी.एम्.एस्./ रिअल इस्टेट / मासिक उत्पन्न योजना / मासिक गुंतणूक योजना इन्मक टॅक्स बॉन्ड / कॅपिटल गेन बॉन्ड

**कार्यालय - २ पाम व्ह्यु, गोखले रोड (नॉर्थ), बँक ऑफ महाराष्ट्राच्या बाजुला,**
**शिवाजी पार्क, दादर (प.), मुंबई - २८**

दूरध्वनी - ०२२-२४४ ५०२५० भ्रमणध्वनी - ९८२१०१४८३७

ईमेल- vishwajeetlic@yahoo.co.in

वेबसाईट - www.vishwajeetlic.njfundz.com

# हार्दिक शुभेच्छा

कमळाकर भाऊ राऊत

संजय कमळाकर राऊत

(M) - 9766565504, 9860221190
9273985971, 9823791612
(R) (02525) 628315

**HARDIK (बंटी)**

# EARTH MOVERS & TRANSPORT

**Building Material Suppliers**
**&Carting Agent**



At. Betegaon, Post Boisar,
Tal.& Dist - Palghar 401 501

*With Best Compliments From :*

**Suresh W. Patil**
**9890352367**
**(02525) 284690**



# CHIRAG PRINTERS

**Industrial & Commercial Printers**

E-mail : chiragprinters.swp@gmail.com

At. Betegaon, P.O. Boisar,
Tal.& Dist - Palghar

# हार्दिक शुभेच्छा

चंद्रकांत पाटील

९८९०३८७११५
ऑ. - ०२५२५ - २८४१३७
घर - ०२५२५ - २८४६६३



# किर्ती किचन वेअर

**आमच्या येथे सर्व प्रकारची स्टीलची स्टॅन्ड (मांडणी) तयार केली जाते.**

मु. बेटेगाव, पो. बोईसर, ता. आणि जि. पालघर


लग्न सोहळा
३०० माणसांचे जेवण
५ ग्रॅम २२ कॅरेट सोन्याचे मंगळसूत्र
पेढे व सरबत
नवरदेवासाठी टू पीस सूट
वधूसाठी शालू
भटजी व हॉल भाड्यासह
फक्त रुपये
१,२१,०००
५०० माणसांचे जेवण
१ ग्रॅम २२ कॅरेट सोन्याचे मंगळसूत्र
पेढे व सरबत
नवरदेवासाठी टू पीस सूट
वधूसाठी शालू
भटजी व हॉल भाड्यासह
फक्त रुपये
१,६१,०००
Sammelan
BANQUET
Sammelan Banquet, Oshiwara Plaza, (Near Oshiwara Petrol Pump),
S. V. Road, Jogeshwari (W), Mumbai - 400 102
Website : www.sammelanpartyhall.com
Tel.: 022-2678 7116 / 93222 01753 / 92232 01753


खुश खबर ! खुश खबर !
लग्न सोहळा
नवरदेवासाठी टू पीस सूट
फक्त रुपये
७१,०००
वाढदिवस
अल्पोपहार
(१०० माणसांसाठी)
बलून डेकोरेशन
हॉल भाड्यासह
वाढदिवस समारंभ
फक्त रुपये
३५,०००
Party Hall
Sammelan Party Hall, 101, 'A' Wing, First Floor, Samarth Complex, Baptista Compound.
Jawahar Nagar Road No. 1, Near Topiwala Municipal Market,
Goregaon (W), Mumbai - 400 062 Web : www.sammelanpartyhall.com
Tel.: 022-2878 7282 / 93222 01753 / 92232 01753

# Manvita Laptops Services

*Laptop Repairs at chip level*


**Prafulla V. Patil**



Laptop Batteries



Adopter




Memories




Laptop LCD, LED



Optical Drives




Laptop repairs



Laptop Motherboard



Keyboard



Laptop Hinges

COMPAQ IBM hp lenovo TOSHIBA LG acer DELL SONY VAIO

**Our Speciality : Any laptop accessories at low prices.**
**New Motherboard warranty 3 months**
**& one year as applicable**

**आमचे वैशिष्ट्य : लॅपटॉपचा कुठलाही भाग वाजवी दरात उपलब्ध,**

**Tel. : 9272569053 / 9867806282**
**Email : pvasantpatil@yahoo.in**
**Allyali, Satpati Road, Tal. & Dist. Palghar - 401 404.**


**बुक - पोस्ट**

प्रति,
श्री. / श्रीमती ______________________

______________________


प्रेषक -
संपादक
**त्रैमासिक वृत्तपत्रिका सो. पा. क्ष. स. संघ**
कर्मवीर ज. पा. राऊत ग्रंथालय, विठ्ठलेश को. ऑप. हाऊ. सोसायटी,
दहिसर (प.), मुंबई - ४०० ०६८. दूरध्वनी : २८९२९४०७ email - spksstvpatrika@gmail.com
**संपादक व प्रकाशक : श्री. विनय रघुनाथ राऊत**
रजिस्ट्रेशन ऑफ न्यूज पेपर, भारत सरकार नोंदणी क्रमांक जी १६५/३२२/९९
**प्रसिद्धी स्थळ** : कर्मवीर ज. पा. राऊत ग्रंथालय, दहिसर (प.), मुंबई - ४०० ०६८.
मुद्रक : ग्राफिक प्रिंटर्स, कस्तूरपार्क, शिंपोली, मुंबई - ९२. दूरध्वनी : २८९९९३३०, ९३२२८४०८४६
इ-मेल : graphic_printers29@rediffmail.com